भाषिक (तेलुगू ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित, नियमित कार्यक्रम

## "तासिका अहवाल" २०२३ - २०२४

| अ. क्रं. | दिनांक | कार्यक्रम | प्रमुख पाहुणे | उपस्थित | उपस्थित संख्या | ठिकाण | कामाचे तास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०५.६.२०२३ | जागतिक पर्यावरण दिन व्याख्यान व वृक्षारोपण | प्रा. डॉ. टी.व्ही. शिंदे | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | २०० | महाविद्यालय | ०४ |
| ०२ | २६.६.२०२३ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त व्याख्यान व स्वच्छता अभियान | प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर | प्रभारी प्राचार्य सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९५ | महाविद्यालय | ०४ |
| ०३ | ०१.७.२०२३ | स्व. वसंतराव नाईक जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १८० | महाविद्यालय | ०१ |
| ०४ | २२.०७.२०२३ | युवा संवाद भारत @ २०२४ | चंद्रकांतदादा पाटील | कुलगुरु डॉ. रजनीश कामत | १५० | हुतात्मा स्मृती मंदिर | ०५ |
| ०५ | २३.७.२०२३ | लोकमान्य टिळक जयंती व वनसंवर्धनदिन | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १८५ | महाविद्यालय | ०३ |
| ०६ | २४.०७.२०२३ | हर घर ध्यान कार्यक्रम | आर्ट ऑफ लिव्हिंग | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९० | महाविद्यालय | ०२ |
| ०७ | ०१.०८.२०२३ | सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०४ |
| ०८ | ०२.०८.२०२३ | स्वच्छता अभियान | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १७५ | महाविद्यालय | ०२ |
| ०९ | ०३.०८.२०२३ | क्रांतीसिंह नानापाटील जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १५० | महाविद्यालय | ०२ |
| १० | ०९.०८.२०२३ | क्रांतीदिन | प्रा. डॉ. सोनाली गिरी | प्र. प्राचार्य, सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९० | महाविद्यालय | ०२ |
| ११ | १२.८.२०२३ | जागतिक युवा दिन | प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे | प्र. प्राचार्य, सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९५ | महाविद्यालय | ०२ |

पान नं. २ वर

| अ. क्रं. | दिनांक | कार्यक्रम | प्रमुख पाहुणे | उपस्थित | उपस्थित संख्या | ठिकाण | कामा तास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ०४.०८.२०२३ | स्वच्छता अभियान | - | - | १६० | महाविद्यालय | ०३ |
| १३ | १५.०८.२०२३ | स्वातंत्र्य दिन | संस्थेचे सचिव मा.दशरथ गोप | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | २०० | महाविद्यालय | ०४ |
| १४ | १८.८.२०२३ | १०७० फुटी तिरंगा रॅली | - | विद्यार्थिनीं | २०० | महाविद्यालय ते शिवाजी पुतळा | ०४ |
| १५ | २०.८.२०२३ | सद्भावना दिन कार्यक्रम | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १८५ | महाविद्यालय | ०२ |
| १६ | २३.८.२०२३ | नवमतदार नोंदणी कार्यक्रम | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व विद्यार्थिनी | १५० | महाविद्यालय | ०२ |
| १७ | २५.८.२०२३ | राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रम | मा. महेद्र घागरे ( पुणे ) | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०३ |
| १८ | ०५.९.२०२३ | शिक्षक दिन कार्यक्रम | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| १९ | ०८.९.२०२३ | जीवन जगताना.. | काशिनाथ भतगुणकी | प्र.प्राचार्य सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| २० | १६०९.२०२३ | जागतिक ओझोन दिन ( तुलशी रोप लागवड ) | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| २१ | २२.०९.२०२३ | कर्मवीर भाऊराव पाटील जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९० | महाविद्यालय | ०२ |
| २२ | २५.९.२०२३ | राष्ट्रीय सेवा योजना दिन व स्वच्छता अभियान | प्रा. डॉ. अनिल साळुंखे | प्र.प्राचार्य सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०४ |
| २३ | ०२.१०.२०२३ | महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री कै. रामचंद्रपंत बुर्लाशेठ जयंती व स्वच्छता अभियान | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०३ |
| २४ | २.१०.२०२३ | म.गांधी जयंती निमित्त वक्तृत्व व निबंध स्पर्धा | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| २५ | ०५.१०.२०२३ | मेरी माटी मेरा देश | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| २६ | ८.१०.२०२३ | महर्षि वाल्मिकी जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १७० | महाविद्यालय | ०२ |

पान नं. ३ वर

| अ. क्रं. | दिनांक | कार्यक्रम | प्रमुख पाहुणे | उपस्थित | उपस्थित संख्या | ठिकाण | कामाचे तास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ३१.१०.२०२३ | स्व. इंदिरा गांधी पुण्यतिथि व स्व. सरदार वल्लभाई पटेल जयंती | प्रा. डॉ. टि.एन. शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| २८ | १४.११.२०२३ | पंडित जवाहरलाल नेहरु जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| २९ | १९.११.२०२३ | स्व. इंदिरा गांधी जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| ३० | २६.११.२०२३ | संविधान दिन कार्यक्रम | प्रा.डॉ. बाळासाहेब भास्कर | प्र. प्राचार्य सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| ३१ | २८.११.२०२३ | महात्मा फुले स्मृती दिन | प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलेदवी | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १७० | महाविद्यालय | ०२ |
| ३२ | ०५.१२.२०२३ | स्वच्छता अभियान | -- | -- | १९० | महाविद्यालय | ०३ |
| ३३ | ६.१२.२०२३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन. शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९५ | महाविद्यालय | ०२ |
| ३४ | ११.१२.२०२३ | विकसित भारत @ २०४७ पंतप्रधान लाईव्ह कार्यक्रम | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन. शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १८० | महाविद्यालय | ०२ |
| ३५ | २५.१२.२०२३ | मा.अटलबिहारी वाजपेयी जन्मदिन "सुशासन दिन" | प्रभार प्राचार्य डॉ. टि.एन.शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १९० | महाविद्यालय | ०२ |
| ३६ | ०३.०१.२०२४ | सावित्रीबाई फुले जयंती | प्रा.डॉ. सारीपुत्र तुपेरे | प्र. प्राचार्य सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०३ |
| ३७ | १२.०१.२०२४ | राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन.शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| ३८ | १३.०१.२०२४ | शिवराज्याभिषेक दिनास ३५० वर्षपूर्ती वक्तृत्वस्पर्धा | - | - | १५० | महाविद्यालय | ०२ |
| ३९ | २३.०१.२०२४ | कै. अनुसयाबाई बुर्ला पुण्यतिथि व सुभाषचंद्र बोस जयंती, बाळासाहेब ठाकरे जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन.शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०४ |
| ४० | २५.०१.२०२४ | स्वच्छता अभियान | - | - | १९५ | महाविद्यालय | ०३ |

पान नं. ४ वर

| अ. क्रं. | दिनांक | कार्यक्रम | प्रमुख पाहुणे | उपस्थित | उपस्थित संख्या | ठिकाण | कामाचे तास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४१ | २५.०१.२०२४ | राष्ट्रीय मतदार दिन | प्रा. डॉ. शिवानंद भांजे | प्र. प्राचार्य, सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १८० | महाविद्यालय | ०२ |
| ४२ | २६.०१.२०२४ | प्रजासत्ताक दिन | मा. प्रा. श्री. श्रीनिवास व्यं. कोंडी | प्र. प्राचार्य, सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०३ |
| ४३ | ३०.०१.२०२४ | महात्मा गांधी पुण्यतिथी | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन.शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |
| ४४ | १९.०२.२०२४ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन.शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | १८५ | महाविद्यालय | ०२ |
| ४५ | २७०२.२०२४ | स्वच्छता अभियान | विद्यार्थिनीं | - | १८० | महाविद्यालय परिसर | ०३ |
| ४६ | ०७.०३.२०२४ | जागतिक महिला दिन कार्यक्रम व्याख्यान व सत्कार | डॉ. दिपाली काळे (डीवायएसपी ) | प्र. प्राचार्य, सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०४ |
| ४७ | ०९.०३.२०२४ | जागतिक महिला दिनानिमित्त ( नेहरु युवा केंद्रांच्या संयुक्त विद्यमाने ) विविध स्पर्धांचे आयोजन | प्रसाद खोबरे | प्र. प्राचार्य, स्टाफ व विद्यार्थिनीं | २०० | महाविद्यालय | ०३ |
| ४८ | १२.०३.२०२४ | यशवंतराव चव्हाण जयंती | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन. शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनीं | १८० | महाविद्यालय | ०२ |
| ४९ | २१.०३.२०२४ | जागतिक जल दिनानिमित्त व्याख्यान व पोस्टर प्रदर्शन | प्रा. डॉ. टी.व्ही. शिंदे | प्र.प्राचार्य, स्टाफ व विद्यार्थिनीं | २०० | महाविद्यालय | ०३ |
| ५० | २३.०३.२०२४ | शहिद दिन | प्रभारी प्राचार्य डॉ. टि.एन. शिंदे | सर्व स्टाफ व विद्यार्थिनी | २०० | महाविद्यालय | ०२ |

प्रा. डॉ. शंकर राजे
कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.विभाग
PROGRAMME OFFICER
National Service Scheme
A. R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur

डॉ. तुकाराम ना. शिंदे
प्रभारी प्राचार्य
प्रभारी प्राचार्य
अ. आर. बुर्ला महिला
वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

भाषिक (तेलुगू ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित कार्यक्रम अहवाल २०२३ - २०२४

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थिनीच्या शैक्षणिक विकासाबरोबर सामाजिक, राष्ट्रीय व पर्यावरण विषयक जागृति निर्माण करण्याच्या अनुषंगाने तसेच विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास साधता यावा या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

त्यामध्ये विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीसह दि.०५ जून, २०२३ रोजी 'जागतिक पर्यावरण दिवस', दि.१६ जून, २०२३ रोजी 'महाराणा प्रताप जयंती', दि.२१ जून,२०२३ रोजी 'जागतिक योग दिवस', दि.२६ जून, २०२३ रोजी 'छ. शाहू महाराज जयंती', दि.०१ जुलै, २०२३ रोजी 'वसंतराव नाईक जयंती', दि.२३ जुलै, २०२३ रोजी 'वनसंवर्धन दिवस' व लोकमान्य टिळक जयंती, २७ जुलै, २०२३ रोजी गुरुपोर्णिमा, दि.०१ ऑगस्ट, २०२३ रोजी 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती' व 'लोकमान्य टिळक पुण्यतिथि', दि.०३ ऑगस्ट, २०२३ 'क्रांतिसिंह नाना पाटील जयंती', दि.०९ ऑगस्ट, २०२३ रोजी 'क्रांतिदिन', दि.१२ ऑगस्ट २०२३ - 'जागतिक युवा दिवस' दि. १५ ऑगस्ट, २०२३ रोजी 'स्वातंत्र्य दिन', दि.२० ऑगस्ट २०२३ 'सद्भावना दिवस', दि. ०५ सप्टेंबर २०२३ 'डॉ. सर्वपल्ली राधाकृणन जन्म दिवस', दि. ०८ सप्टेंबर २०२३ रोजी 'साक्षरता दिवस', दि.२४ ते ३० सप्टेंबर २०२३ 'रासेयो. सप्ताह', दि.२४ सप्टेंबर २०२३ -'राष्ट्रीय सेवा योजना दिवस', दि ०२ ऑक्टोंबर, २०२३ रोजी 'महात्मा गांधी', 'लाल बहादूर शास्त्री' व 'रामचंद्रपंत बुर्ला जयंती', दि.२४ ऑक्टोंबर, २०२३ रोजी 'महर्षि वाल्मिकी जयंती', दि.३१ ऑक्टोंबर, २०२३ रोजी 'इंदिरा गांधी पुण्यतिथि' व 'सरदार वल्लभभाई पटेल जयंती', दि. १४ नोव्हेंबर, २०२३ रोजी 'पंडित जवाहरलाल नेहरु जयंती' (बालदिन), दि.१९ नोव्हेंबर, २०२३ रोजी 'इंदिरा गांधी जयंती', दि. २६ नोंव्हेबर २०२३ रोजी 'संविधान दिन', दि.२८ नोव्हेंबर, २०२३ रोजी 'महात्मा फुले जयंती', दि.०६ डिसेंबर, २०२३ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन', दि.०३ जानेवारी, २०२४ रोजी 'सावित्रीबाई फुले जयंती', ( बालिका दिन ) दि.१२ जानेवारी, २०२४ रोजी 'राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती' व हुतात्मा दिन, दि.२३ जानेवारी, २०२४ रोजी 'अनुसयाबाई बुर्ला पुण्यतिथि' व 'नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती', दि. २६ जानेवारी, २०२४ रोजी भारतीय 'प्रजासत्ताक दिन', १९ फेब्रुवारी २०२४ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती' दि. ०८ मार्च २०२४ 'जागतिक महिला दिवस', दि.१२ मार्च, २०२४ रोजी 'यशवंतराव चव्हाण जयंती', दि. २२ मार्च २०२४ रोजी 'जागतिक जल दिन', दि.२३ मार्च, २०२४ 'क्रांतीवीर भगतसिंग, राजगुरु, सुखदेव शहिद दिन', दि.११ एप्रिल २०२४ रोजी 'महात्मा ज्योतीबा फुले जयंती', दि.१४ एप्रिल २०२४ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती', १८ एप्रिल २०२४ रोजी 'बसवेश्वर जयंती', दि.३१ मे २०२४ रोजी 'अहिल्याबाई होळकर जयंती', 'जागतिक तंबाखू विरोधी दिन', अशा विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथिसह महत्वपूर्ण दिवसाचे महत्व विशद करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पान नं. २ वर

➢ **विविध स्पर्धांचे आयोजन :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थिनींना व्यासपीठ उपलब्ध करुन दयावे व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा म्हणून दि.०८ सप्टेंबर २०२३ साक्षरता सप्ताह, दि. १४ ते २८ सप्टेंबर २०२३ रोजी हिंदी पंधरवाडा व दि.०२ ते ०८ ऑक्टोंबर २०२३ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त **'स्वच्छता सप्ताह'** व डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती इत्यादी सप्ताहा निमित्त निबंध, वक्तृत्व, घोषवाक्य, कविता व सामान्य ज्ञान अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

केंद्र शासनाच्या आदेशानुसार **" हर हर घर ध्यान"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

➢ **स्वच्छता अभियान उपक्रमाचे आयोजन :-**

**' स्वच्छता तेथे समृध्दी'** ही विचारधारा विद्यार्थिनी व समाजामध्ये वृध्दिंगत करावी म्हणून केंद्र व राज्य शासनाच्या सन २०१४ च्या आदेशानुसार महाविद्यालयात दर बुधवारी **'स्वच्छ भारत अभियान'** राबवून महाविद्यालयाच्या आसपासचे सार्वजनिक रस्ते, बस स्टॉप, विणकर बगीच्या, बापुजी सांळुखे पुतळा अशा विविध ठिकाणासह महाविद्यालयाचा अंतर्गत परिसर रासेयोच्या विद्यार्थिनींच्या सहभागाने स्वच्छ करण्यात आले.

➢ **रक्तदान शिबीराचे आयोजन :-**

**'रक्तदान श्रेष्ठ दान'** ही संकल्पना विद्यार्थिनी मध्ये रुजवावी या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वत्तीने दि.१२ फेब्रुवारी, २०२४ श्री. मार्कंडेय महामुनीच्या जन्मोत्सवानिमित्त सहयाद्री रक्तपेढी च्या सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर रक्तदान शिबीरात २०० रक्तदात्याने रक्तदान केले.

➢ **प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थिनींचे प्रबोधन व्हावे या हेतून दि.२५/०८/२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रमा निमित्त मा. महेद्र घागरे ( हरित मित्र परिवार, पुणे ) यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते. तर दि.०५.१०.२०२३ रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्या अध्यक्षतेखाली **" मेरी माटी मेरा देश "** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २६ नोव्हेंबर, २०२३ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त प्रा. डॉ. बाळासाहेब भास्कर यांचे 'भारताचे संविधान' या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

पान नं. ३ वर

➢ **रॅलीत सहभाग :-**

दि.१८.०८.२०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रा.से.यो. विभागाच्या संयुक्त विद्यमाने १०७० फुटी तिरंगा रॅलीत सहभाग, दि. १७.०२.२०२४ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने शिवराज्यभिषेक दिनास ३५० वर्षे पुर्ती निमित्त आयोजित रॅलीत सहभाग

➢ **प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग :-** सोलापूर विद्यापीठ आयोजित राजमाता जिजाऊ प्रशिक्षण शिबीरात सहभाग तसेच छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आयोजित तीन दिवशीय **"आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण शिबीरात "** सहभाग.

➢ **राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ठ स्वयंसेविका पुरस्कार :-**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षामध्ये नियमित्त कार्यक्रम **उत्कृष्ट स्वयंसेविका** म्हणून कु. कुलकर्णी धनश्री धोंडिराम (B. Com. II) तर उत्कृष्ट शिबीरार्थी म्हणून कु. कनकी वैष्णवी गोवर्धन (B.Com.- II) या विद्यार्थिनीना पुरस्कृत करण्यात आले.

प्रा. डॉ. शंकर राजे
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
PROGRAMME OFFICER
National Service Scheme
A. R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur

डॉ. तुकाराम ना. शिंदे
प्रभारी प्राचार्य
अे. आर. बुर्ला महिला
वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

**शिबीर कालावधी : ०५.०१.२०२४ ते ११.०१.२०२४**

**दत्तक गाव : मौजे गुळवंची, ता. उत्तर सोलापूर**

शैक्षणिक वर्ष **२०२३-२०२४** या वर्षातील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. **०५.०१.२०२४ ते ११.०१.२०२४** दरम्यान मौजे गुळवंची, ता. उत्तर सोलापूर येथे **"युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास"** हे उद्दीष्ट घेऊन संपन्न झाले. सदर शिबीरात महाविद्यालयाच्या **१००** विद्यार्थिनीं सहभागी झाल्या होत्या. शिबीर कालावधीत मौजे गुळवंची येथे शिबीरार्थी व ग्रामस्थांच्या सहकार्याने प्रबोधनात्मक, मनोरंजनात्मक कार्यक्रमाबरोबर अनेक समाजउपयोगी विधायक उपक्रमही राबविण्यात आले.

१. **उद्घाटन कार्यक्रम :-** मौजे गुळवंची येथिल विशेष श्रम संस्कार शिबीराचे उद्घाटन **दि.०५/०१/२०२४** रोजी पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव मा. दशरथ नारायण गोप यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी सरपंच सौ. तृप्ती पौळ, उपसरपंच सौ. सुनंदा पौळ, शिवसेना तालुकाध्यक्ष श्री. संजय पौळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टि. एन. शिंदे होते.

२. **प्रबोधनात्मक कार्यक्रम :-** या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या ७ दिवसाच्या कालावधीत अनेक समाजोपयोगी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.०६.०१.२०२४ रोजी मा. सौ. निशा भोसले यांचे **"अंधश्रध्दा निर्मुलन काळाची गरज"** त्याच दिवशी मा. सचिन जाधव यांचे **"स्वच्छतेत ग्रामस्थांची भूमिका"** या विषयावर व्याख्यान झाले. दि.०७.०१.२०२४ रोजी मा. श्री. अनिल केंगार व सुनिल वाघमोडे (मुंबई) यांनी भारुडाच्या माध्यमातून जनजागृती केली. दि.०८.०१.२०२४ रोजी प्रा. डॉ. आण्णासाहेब साखरे यांचे **"राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांची भूमिका"** या विषयावर व्याख्यान झाले.

**पान नं. २ वर**

दि.०९.०१.२०२४ रोजी मा. महेंद्र घागरे (पुणे) यांचे **"वृक्ष लागवड काळाची गरज"** तर प्राचार्य डॉ. आशा रोकडे यांचे **"ग्राम विकासात महिलांची भूमिका"** या विषयावर व्याख्यान झाले. दि.१०.०१.२०२४ रोजी शिवचरित्र अभ्यासक मा. डॉ. शिवरत्न शेटे यांचे **"जीवन घडविताना"** या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान झाले.

**३. मेळावा आयोजन :-** विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या कालावधीत दत्तक गावातील लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दि.०७.०१.२०२४ रोजी प्रा. डॉ. शिवानंद भांजे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी मेळावा तर दि.१०.०१.२०२४ रोजी प्रा. डॉ. रंजना बनसुडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व युवती मेळावा घेण्यात आला.

**४. आरोग्य तपासणी शिबीर :-** दि.०८.०१.२०२४ रोजी गावातील नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने सर्व रोग निदान व उपचार शिबीर घेण्यात आले.

**५. गाव सर्व्हे प्रश्नावली :-** विशेष श्रमसंस्कार शिबीर कालावधीत गावातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीच्या माध्यमाने घरोघरी जाऊन गाव सर्व्हे करण्यात आला.

**६. ग्राम स्वच्छते बाबत जनजागृती :-** विशेष श्रमसंस्कार शिबीर कालावधीत दत्तक गावात **"युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास"** या उद्दिष्टांच्या आधारे गावातील अंतर्गत रस्ते, प्राथमिक जिल्हा परिषद शाळा, मंदिरे, समाज मंदिरे तसेच अंतर्गत गटारी स्वच्छ करण्यात आल्या. या माध्यमातून ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले.

**७. सांस्कृतिक कार्यक्रम :-** महाविद्यालयीन तसेच स्थानिक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दि.१०.०१.२०२४ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पान नं. ३ वर

८. **सदिच्छा भेट :-** राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दि.०५.०१.२०२४ ते ११.०१.२०२४ या कालावधीत मौजे गुळवंची येथे आयोजित शिबीरास डॉ. दिगंबर नेटके (परिक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड), डॉ. मल्लिकार्जून करजगी (रा. से. योजना संचालक, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड) श्री. रामचंद्र दळवी (अध्यक्ष, एस. आर. फौडेशन, मुंबई), सौ. सिता दळवी (एस. आर. फौडेशन, मुंबई), प्रा. डॉ. राजेंद्र वडजे (संचालक, रा. से. योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदिच्छा भेटी दिल्या.

९. **समारोप :-** मोजे गुळवंची येथे दि.०५.०१.२०२४ ते दि.११.०१.२०२४ या कालावधीत संपन्न झालेल्या या विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप दि.११.०१.२०२४ रोजी पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्री. श्रीनिवास कोंडी, विश्वस्त मा. श्रीधर चिटयाल, सरपंच सौ. तृप्ती पौळ, उपसरपंच सौ. सुनंदा शिंदे, शिवसेना तालुका अध्यक्ष श्री. संजय पौळ यांच्या उपस्थितीत आणि प्राचार्य डॉ. टि. एन. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

डॉ. शंकर राजे
रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी
PROGRAMME OFFICER
National Service Scheme
A. R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur

प्रा. डॉ. तुकाराम ना. शिंदे
प्रभारी प्राचार्य
अे. आर. बुर्ला महिला
वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

भाषिक ( तेलुगु ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापुर.


## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२३-२४

## मौजे गुळवंची




रा.से. योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात "जीवन घडविताना..." या विषयावरील व्याख्याते मा. डॉ. शिवरत्न शेटे यांचे स्वागत करताना मा. संजय पौळ, सरपंच तृप्ती पौळ, कार्यक्रमाधिकारी डॉ. शंकरराव




"माझे मन" या उपक्रमांतर्गत विविध सामाजिक समस्येवर आपापली मनोगते व्यक्त करताना शिबीरार्थी

भाषिक ( तेलुगु ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापुर.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२३-२४

## मौजे गुळवंची



रा.से.योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीर कालावधीत गाव-सर्वेक्षणांतर्गत प्रश्नावली द्वारे गावाविषयी माहिती जाणून घेताना शिबीरार्थी




गावसर्वेक्षणांतर्गत प्रश्नावलीद्वारे गाव माहितीचे संकलन करताना शिबीरार्थी सोबत डॉ. रंजना बनसुडे

भाषिक ( तेलुगु ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापुर.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२३-२४
## मौजे गुळवंची



रा.से. योजनेच्या विशेष श्रमशिबीरात ग्रामस्वच्छता करताना शिबीरार्थी




रा.से. योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात रक्तदान करताना ग्रामस्थ व शिबीरार्थी

भाषिक ( तेलुगु ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापुर.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२३-२४

## मौजे गुळवंची




रा.से.योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात श्रमदान करताना शिबीरार्थी




रा.से.योजनेच्या शिबीरात ग्रामस्वच्छता करताना शिबीरार्थी

ARBM
A.R. Bur... ...dyalaya
Solapur


भाषिक ( तेलुगु ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापुर.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२३-२४

## मौजे गुळवंची




रा.से.योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात रोजच्या दिनचर्येची सुरुवात योगाने करताना शिबीरार्थी




योगा करताना शिबीरार्थी

भाषिक ( तेलुगु ) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

# ए. आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापुर.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२३-२४

## मौजे गुळवंची



ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय व पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रा. से. योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरा-च्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना उद्घाटक मा. श्री. दशरथ गोप साहेब (सचिव प. शि. सं.)




"अंधश्रद्धा निर्मुलन काळाची गरज" या विषयावर मार्गदर्शन करताना मा. सौ. निशा भोसले व सहकारी

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

## ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो









पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो

A. R. Burla Mahila Mahavidyalaya ARBM Solapur












पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

## ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो

A. R. Burla Mahila Mahavidyalaya ARBM * Solapur *









पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो

A. R. Burla Mahila Mahavidyalaya ARBM Solapur











पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो

A. R. Burla Mahila Mahavidyalaya ARBM Solapur










पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो









पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो

A. R. Burla Mahila Mahavidyalaya ARBM Solapur










पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

# ए . आर . बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय , सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२३-२०२४ नियमित कार्यक्रमाचे फोटो

A. R. Burla Mahila Mahavidyalaya ARBM Solapur







